# Snapchat पालक आणि देखभाल करणाऱ्यांसाठी मार्गदर्शिका



## यात काय आहे?

- Snapchat ची वैशिष्ट्ये
- सामान्यतः वारंवार विचारले जाणारे प्रश्न
- सुरक्षा आणि आरोग्य संसाधने
- संभाषण सुरू करा

# Snap Inc. मध्ये काम करणाऱ्या पालकांचे पत्र

प्रिय पालक,

तुमच्या किशोरवयीन मुलाने/ मुलीने Snapchat वापरकर्त्याचे खाते तयार केले आहे. आता काय करायचे? तुम्ही साशंक आहात. तुमच्या किशोरवयीन मुलाला/मुलीला असे ॲप का वापरायचे आहे जिथे त्यांचा बराच मजकूर आपोआप हटवला जातो? सोशल प्लॅटफॉर्म सतत विकसित होत आहेत आणि आम्ही समजतो की नेहमी त्याची पूर्ण माहिती असणे कठीण आहे. प्रश्न आणि काळजी असणे सहाजिक आहे आणि आम्ही आशा करतो की Snapchat विषयी शिकून घेण्यात आणि तुमच्या किशोरवयीन मुलाला/मुलीला सुज्ञ आणि सक्षम करण्याचे साधन बनण्यात ही मार्गदर्शिका तुम्हाला मदत करेल.

आम्हाला माहित आहे की आमचे ॲप वापरताना तुमचा किशोरवयीन मुलगा/मुलगी पूर्णपणे सुरक्षित असून त्याच्याकडे सर्व माहिती आहे हे तुम्ही सुनिश्चित करू इच्छिता. किशोरवयीन मुलांना/मुलींना त्यांची सर्जनशीलता आणि त्यांचे प्रामाणिक स्वरूप व्यक्त करण्यासाठी एक स्थान प्रदान करणे हा आमचा हेतू आहे. Snapchat पारंपारिक सोशल मीडिआपेक्षा भिन्न आहे कारण हे ॲप जवळच्या मित्रांच्या संपर्कात राहण्याचा एक मजेशीर मार्ग म्हणून तयार केले गेले होते, अनोळखी लोकांशी नाही.

**“ माझ्या किशोरवयीन मुलाला/मुलीला असे ॲप का वापरायचे आहे जिथे त्यांचा बराच मजकूर आपोआप हटवला जातो? ”**

दुसऱ्या प्लॅटफॉर्मप्रमाणे, आम्ही सार्वजनिक टिप्पण्यांना अनुमती देत नाही आणि आमच्या डिफॉल्ट सेटिंग्जनुसार Snapchatter फक्त मित्र म्हणून जोडलेल्या लोकांकडून मेसेज प्राप्त करू शकतात.

मित्रांसोबत बोलण्याव्यतिरिक्त, Snapchat कुटुंबाच्या संपर्कात राहण्यासाठीदेखील उत्तम आहे. Snapchat तुम्हाला मजेशीर आणि सहज मार्गाने संवाद साधण्यासाठी तुमच्या सृजनशीलतेचा वापर करण्यात मदत करते! हे फक्त एकमेकांसोबत मजा करण्याचे स्थान आहे (शिल्लक कामांची सूची किंवा भांडी घासण्याच्या रिमाइंडर्सची काळजी येथे नाही). त्याऐवजी, तुम्ही वेड्यासारखी चित्रे पाठवू शकता आणि आत्ताच्या क्षणात जगू शकता (तुमचा कॅमेरा रोल भरल्याशिवाय!). तुमचा किशोरवयीन मुलगा/मुलगी शाळेत असताना तुमच्या पाळीव प्राण्याची Snap चित्रे घेण्यासाठी Snapchat वापरा किंवा तुमच्या किशोरवयीन मुलाला/मुलीला हसवण्यासाठी आमचे लेन्सेस जोडा.

आम्ही समजतो की संवाद साधण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ॲपमध्ये दुरुपयोगाची संभावना असते म्हणूनच आम्ही आमच्या प्लॅटफॉर्मवर सुरक्षा प्रदान करण्यासाठी वेळ, संसाधने आणि परिश्रम करण्याकडे लक्ष दिले आणि अजूनही देत आहोत. व्यापक स्तरावर ॲपमधून तक्रार करणे, आमचे सामुदायिक दिशानिर्देश आणि मोठ्या प्रमाणातील सक्रिय सुरक्षा पार्टनर्ससह, आम्ही आमच्या किशोर मुलांना/मुलींना कळवतो की त्यांच्या सुरक्षेस आम्ही प्राधान्य देतो.

स्वतःला सुरक्षितपणे व्यक्त करण्यासाठी, याक्षणी जगण्यासाठी, जगाबद्दल शिकण्यासाठी आणि एकत्र मजा करण्यासाठी तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबाला सशक्त करणारी अतिरिक्त माहिती तुम्हाला प्रदान करण्यासाठी आम्ही ही पालकांची मार्गदर्शिका तयार केली आहे. आम्ही आशा करतो की तुमचा किशोर मुलगा/मुलगी ऑनलाइन काय करतो/ते याविषयी त्यांच्यासोबत मुक्त आणि प्रामाणिक संवाद साधण्यासाठी तुम्हाला ती उपयोगी वाटेल.

**लक्षात ठेवा, आम्ही तुमच्यासाठी आणि तुमच्या किशोर मुलांसाठी/मुलींसाठी कायम आहोत!**

**- Snap Inc. मध्ये काम करणारे पालक**



# अनुक्रमणिका

३ Snapchat काय आहे?

४ सामान्यत: वारंवार विचारले जाणारे प्रश्न

६ मुख्य वैशिष्ट्ये

७ आमचे गोपनीयता सिद्धांत

८ उपयोगी सुरक्षितता टिपा

९ आरोग्य संसाधने

१० Snapchat विषयी तुमच्या किशोरवयीन मुलासोबत/मुलीसोबत कसे बोलायचे

# Snapchat १०१

## Snapchat काय आहे?



पालक किंवा शिक्षक म्हणून तुम्हाला कदाचित माहित असेल की Snapchat आजकाल किशोर मुलं/मुली त्यांच्या मित्रमैत्रिणींसोबत संवाद साधण्यासाठी वापरतात असे मेसेजिंग आणि कॅमेरा ॲप आहे. सुरुवातीपासूनच, आम्ही वास्तविक मित्र जेव्हा एकमेकांपासून दूर असतात तेव्हा त्यांना संपर्कात राहण्यात मदत करण्याकडे आणि एखाद्या क्षणात त्यांना स्वत:ला सहजरित्या व्यक्त करता यावे याकडे लक्ष दिले. लोकांना त्यांच्या कॅमेऱ्याने स्वत:ला सहजरित्या व्यक्त करण्यासाठी Snapchat एक साधन म्हणून तयार केले गेले.

Snapchat मुद्दाम पारंपारिक सोशल मीडियापेक्षा वेगळे बनवले आहे, जे यास आमच्या समुदायासाठी अतिशय सुरक्षित बनवते. आम्ही Snapchat आणि इतर प्लॅटफॉर्मच्या योग्य वापराविषयी पालक आणि किशोरवयीन मुलं/मुलींनी नियमित संवाद साधावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करतो म्हणूनच आम्ही ही मार्गदर्शिका तयार केली आहे.



# सामान्यत: वारंवार विचारले जाणारे प्रश्न


आमच्या कॅमेऱ्यासह, टेक्स्ट मेसेजपर्यंत मर्यादित न राहता आमची सर्जनशील साधने वापरून एका Snap मध्ये बरेच काही सांगून लोकांना स्वत:ला व्यक्त करता यावे यासाठी आम्ही एक मार्ग तयार केला आहे. Snapchat वर, तुमच्या जवळच्या लोकांसोबत तुम्ही जसे आहात तसेच राहण्यासाठी स्वतंत्र आहात. तुमच्या सर्वात सामान्य प्रश्नांची उत्तरे येथे दिली आहेत:

## १ हे ॲप कसे काम करते?

तुम्ही एका वापरकर्त्याच्या खात्यासाठी साइन-अप आणि तुमचा Bitmoji तयार केल्यानंतर, आता एक्स्प्लोर करायला सुरुवात करा! Snapchat मध्ये ५ टॅब आहेत (डावीकडून उजवीकडे): मॅप, चॅट, कॅमेरा, गोष्टी आणि स्पॉटलाइट. Snapchat उघडल्यावर कॅमेरा उघडतो.

फोटो घेण्यासाठी फक्त कॅमेरा आयकॉनवर टॅप करा किंवा व्हिडिओ घेण्यासाठी धरून ठेवा. तुम्ही “Snaps” म्हटले जाणारे फोटो आणि व्हिडिओ मित्रांना पाठवू शकता, जे अनोळखी लोकांकडून सहज मेसेज प्राप्त करण्यासाठी डिझाइन केलेले नाहीत. तुम्ही पहिल्यांदा खाते तयार करता तेव्हा तुम्ही मित्र म्हणून जोडलेले नाही अशा एखाद्या व्यक्तीकडून तुम्ही आपोआप मेसेज प्राप्त करू शकत नाही.

स्वत:ला व्यक्त करा!



तुम्ही कोणासोबत गोष्टी शेअर करायच्या, कशा शेअर करायच्या आणि त्या Snapchat वर किती वेळ पाहिल्या जाऊ शकतात हे तुम्ही नियंत्रित करू शकता.

## २ मला Snaps विषयी अजून माहिती द्या?

प्रत्यक्ष संभाषणाप्रमाणे, Snaps पटकन आणि सहज संवाद साधण्यासाठी बनवले गेले आहे! म्हणूनच जेव्हा तुम्ही एखाद्या मित्राला Snap पाठवता तेव्हा Snap आपोआप हटवला जातो हे अगदी आपण बोललेल्या शब्दांप्रमाणे आहे. आम्हाला विश्वास आहे की म्हणूनच आम्ही दररोज Snapchat वर या स्तराचे प्रामाणिक संभाषण पाहतो.





लक्षात ठेवा, जरी Snaps आपोआप हटवण्यासाठी डिझाइन केले असले तरीही एखादा मित्र त्याचा स्क्रीनशॉट घेऊ शकतो, स्क्रीन रेकॉर्ड करू शकतो किंवा ते दुसऱ्या डिव्हाइसवरून कॅप्चर करू शकतो.



## ३ Snap ची सुरक्षितता मानके काय आहेत?

Snapchat वर सर्व वापरकर्त्यांना Snap च्या सेवा अटी आणि सामुदायिक दिशानिर्देश यांचे पालन करणे आवश्यक आहे, जे द्वेषपूर्ण भाषा, भेदभाव, चुकीची माहिती, दमदाटी, छळवणूक, हिंसक मजकूर, आणि बरेच काही प्रतिबंधित करते. Snap च्या विशेष टीम्स ही धोरणे तयार करतात आणि अंमलात आणतात.



आम्ही आमच्या वापरकर्त्यांचे संरक्षण कसे करतो याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी, आमचे गोपनीयता केंद्र पहा.

## ४ खाते तयार करण्यासाठी वयोमर्यादा आहे का?

होय. १३ वर्षांखालील कोणालाही Snapchat खाते तयार करण्याची किंवा वापरण्याची अनुमती नाही आणि आम्ही १३ वर्षांखालील मुलांना आमच्या सेवा प्रदान करत नाही. जर तुमचे १३ वर्षांखालील मूल Snapchat वापरत असेल तर कृपया तुमच्या मुलाच्या/मुलीच्या वापरकर्त्यानावासह आणि तुमच्या नात्याच्या सत्यापनासह आमच्याशी संपर्क करा.

## ५ मला माझ्या किशोरवयीन मुलाला/मुलीला Snapchat वर सुरक्षित राहण्यास कशी मदत करता येईल?

Snapchat मुद्दाम पारंपारिक सोशल मीडिआपेक्षा वेगळे बनवले आहे, जे यास आमच्या समुदायासाठी अतिशय सुरक्षित बनवते. Snapchat मित्रांसोबत आणि प्रियजनांसोबत कनेक्ट करण्याचे आणि संवाद साधण्याचे स्थान आहे, पण सुरक्षित कसे रहायचे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आमची धोरणे, आमची टीम, आणि पालक आणि शिक्षकांसाठी माहितीविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आमचे सुरक्षा केंद्र पाहावे अशी आम्ही शिफारस करतो. या तुमच्या किशोरवयीन मुलासाठी/मुलीसाठी काही उपयोगी टिपा आहेत: क्लिष्ट पासवर्ड तयार करावे, त्यांच्या ईमेल आणि मोबाइल नंबरचे सत्यापन करावे, फक्त ते प्रत्यक्षात ओळखत असलेल्या व्यक्तींकडून मित्र विनंत्या स्वीकाराव्यात, आणि आमचे सामुदायिक दिशानिर्देश वाचावे जेणेकरून ते त्यांच्या मित्रांनादेखील त्यांचे अनुसरण करण्यास मदत करू शकतात!

**" फक्त तुम्ही प्रत्यक्षात ओळखत असलेल्या लोकांकडून मित्र विनंत्या स्वीकारा. "**




## ६ मला सुरक्षाविषयक चिंता असल्यास तक्रार कशी करता येईल?

आम्ही अयोग्य वापरकर्ते आणि मजकूराची ॲपमधून तक्रार करून आणि प्लॅटफॉर्मबाहेर अभिप्राय देऊन आमच्या समुदायासाठी संपर्क साधणे सोपे बनवतो. वापरकर्ते ॲपमधून तक्रार करून, आमच्या सहाय्यता पोर्टलवरून आणि Snapchat सहाय्यता Twitter खात्यावरून कोणत्याही मजकुराची तक्रार करू शकतात. आम्ही आमच्या सामुदायिक दिशानिर्देशांनुसार कारवाई करतो आणि Snapchat सुधारण्यासाठी अभिप्राय एकत्रित करतो.

**लक्षात ठेवा:** एखाद्याला *तात्काळ* धोका आहे असे तुम्हाला वाटत असेल तर लगेच तुमच्या स्थानिक कायदा अंमलबजावणी एजन्सीशी संपर्क साधा.




**" आम्ही प्रभावी दिशानिर्देश तयार करण्याकडे, आमच्या Snapchatters ना संरक्षित करण्याकडे आणि सृजनशीलता आणि स्वअभिव्यक्तीसाठी एक सुरक्षित, मजेशीर वातावरण प्रदान करण्याकडे लक्ष देतो. तुमच्या किशोर मुलाला/मुलीला कधीही सुरक्षाविषयक चिंता असेल तर, त्यांनी नेहमी आमच्याकडे तक्रार केली पाहिजे. "**



# Snapchat कसे वापरायचे मुख्य वैशिष्ट्ये

ॲप नॅव्हिगेट करण्यात तुम्हाला मदत करण्यासाठी, खालील Snapchat चे मूलभूत नियम पहा. वैशिष्ट्यांच्या संपूर्ण सूचीसाठी, पेज १२ वर दिलेली आमची Snap शब्दावली पहा.

**प्रथम गोष्ट**: Snapchat मध्ये फोटो आणि व्हिडिओ मेसेज पाठवण्याव्यतिरिक्त बरेच काही केले जाऊ शकते.  ॲपमध्ये ५ टॅब आहेत (डावीकडून उजवीकडे): Snap मॅप, चॅट, कॅमेरा, गोष्टी आणि स्पॉटलाइट.




## Snap मॅप:

Snap मॅप आमच्या समुदायाला त्यांच्या बेस्ट फ्रेंड्सशी तसेच जगभरातील वेगवेगळ्या स्थानांशी कनेक्ट करते. आमच्या सर्व उत्पादनांप्रमाणे, Snap मॅप गोपनीयतेस प्राथमिकता देऊन डिझाइन केले गेले आहे आणि सर्व वापरकर्त्यांसाठी स्थान-शेअरिंग आपोआप बंद केलेले असते. जेव्हा Snapchatter पहिल्यांदा Snap मॅप उघडतात तेव्हा त्यांना त्यांचे स्थान शेअर पुढीलपैकी कोणासोबत शेअर करायचे आहे हे निवडण्यासाठी सूचित केले जाते - सर्व मित्रांसोबत, काही मित्रांसोबत किंवा कोणाहीसोबत नाही (घोस्ट मोड). Snap मॅपवरील ठिकाणे Snapchatters ना व्यवसायाची वेळ आणि अभिप्राय पाहण्यासाठी, पार्सल आणि डिलिव्हरी ऑर्डर करण्याची अनुमती देतात.



## चॅट:


सुरुवातीपासूनच आम्ही खरे मित्र दूर असताना त्यांना कनेक्ट करण्यास मदत करण्याकडे आणि प्रत्येक क्षणात स्वत:ला सहजपणे व्यक्त करण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. Snapchat फोन आणि व्हिडिओ कॉल तसेच व्हिडिओ, फोटो, ऑडिओ आणि टेक्स्ट चॅट करण्याची अनुमती देते. मेसेज आपोआप हटवले जातात आणि मित्र नसलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून वापरकर्ता वैयक्तिक चॅट प्राप्त करू शकत नाही.



## कॅमेरा:

Snapchat आपोआप कॅमेरा उघडते. येथे तुम्ही व्हिडिओ किंवा फोटो स्वरूपात Snaps घेऊ शकता. Snap तयार केल्यानंतर त्यावर फिल्टर्स, टेक्स्ट, स्टिकर्स, अटॅचमेंट्स आणि आणखी बरीच सर्जनशील साधने जोडली जाऊ शकतात. एखादे Snap:

- चॅटमध्ये पाठवले जाऊ शकते
- मेमरीझमध्ये सेव्ह केले जाऊ शकते
- माझी गोष्ट किंवा खाजगी गोष्ट तयार करा किंवा सानुकूल गोष्ट यांमध्ये जोडले जाऊ शकते
- हटवले जाऊ शकते




Snapchat Snaps आणि चॅट केव्हा हटवते याविषयी अतिरिक्त माहितीसाठी, कृपया येथे आमचा सहाय्यता लेख पहा. पेज २७ वर या अटींबाबत अधिक माहिती मिळवा!


## गोष्टी:

येथे Snapchatters त्यांच्या मित्रांच्या, मजकूर निर्मात्यांच्या आणि विस्तृत Snapchat समुदायाच्या गोष्टी पाहू शकतात! येथे तुम्ही डिस्कव्हर आणि “तुमच्यासाठी” पर्यायामधील सदस्यता सूचीदेखील पाहू शकता.


## स्पॉटलाइट:


स्पॉटलाइटवर Snapchat समुदायाद्वारे तयार केलेले सर्वात मनोरंजक Snaps दाखवले जातात. वेगवेगळा मजकूर पाहण्यासाठी वर आणि खाली स्वाइप करून एक्स्प्लोर करा. तुम्हाला असे काही दिसले जे तुम्ही अजून पाहू इच्छिता तर ते आवडते करण्यासाठी हार्टवर टॅप करा आणि तुमची फीड वैयक्तिकृत करा!





# Snapchat वर गोपनीयता आमचे गोपनीयता सिद्धांत





Snap वर, आम्ही तुमच्या गोपनीयतेला प्राधान्य देतो. आम्हाला माहित आहे की तुम्ही प्रत्येक वेळा Snapchat वापरता किंवा आमची इतर कोणतीही उत्पादने वापरता तेव्हा आम्ही तुमचा विश्वास कमवतो म्हणूनच आम्ही तुमची माहिती इतर तंत्रज्ञान कंपन्यांपेक्षा वेगळ्या प्रकारे हाताळतो.

आमची उत्पादने सतत विकसित होत असली तरीही आमचे गोपनीयता सिद्धांत बदलणार नाहीत:

- आम्ही प्रामाणिकपणे आणि जाहिरपणे संवाद साधतो
- तुम्ही निवड करता की तुम्हाला स्वतःला कसे व्यक्त करायचे आहे
- आम्ही गोपनीयता लक्षात ठेऊन डिझाइन करतो
- तुमची माहिती तुम्ही नियंत्रित करता

आम्ही तुमच्या गोपनीयतेला सर्वोच्च प्राधान्य कसे देतो याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आमचे गोपनीयता केंद्र पहा, जिथे तुम्हाला आमच्या गोपनीयता सिद्धांतांवर, आमच्या गोपनीयता धोरणांवर अधिक तपशील सापडतील आणि जर तुम्ही मुख्य समस्यांचा सारांश शोधत असाल तर कृपया तुमची गोपनीयता, स्पष्ट केली याचे पुनरावलोकन करा.

# Snapchat वर सुरक्षित राहणे

# उपयोगी सुरक्षितता टिपा

Snapchat मित्रांसोबत आणि प्रियजनांसोबत कनेक्ट करण्याचे आणि संवाद साधण्याचे स्थान आहे, पण सुरक्षित कसे रहायचे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आमची धोरणे, आमची टीम, आणि पालक आणि शिक्षकांसाठी माहितीविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आमचे सुरक्षा केंद्र पहा याची आम्ही शिफारस करतो. लक्षात ठेवा, Snapchat १३ वर्षे वयोगटापेक्षा मोठ्यांसाठी आहे.

आम्ही Snapchatters ना ते अनुभवत असलेल्या मानसिक आरोग्य किंवा भावनात्मक संकटादरम्यान किंवा या समस्यांविषयी जाणून घेऊन ते अनुभवणाऱ्या मित्रांची ते कशी मदत करू शकतात यासाठी ॲपमधून सहायतादेखील प्रदान करतो. जेव्हा Snapchatters चिंता, नैराश्य, ताण, दु:ख, आत्मघाती विचार आणि दमदाटी यांसारखे विशिष्ट विषय शोधतात तेव्हा आमचे Here For You साधन तज्ञांसोबत विकसित केलेली सुरक्षा संसाधने प्रदान करते.

Snapchat वर सुरक्षित राहण्यासाठी काही टिपा!

१ **एक क्लिष्ट पासवर्ड निवडा**: किमान ८ वर्ण लांब असलेला पासवर्ड निवडा आणि वैयक्तिक माहिती जसे की तुमचे नाव, वापरकर्तानाव, फोन नंबर किंवा वाढदिवस समाविष्ट करू नका. तुमच्या पासवर्डमध्ये अंक, चिन्हे, कॅपिटल आणि लोअरकेस अक्षरांचे संयोजन समाविष्ट करा. तुमचा पासवर्ड इतरांसोबत शेअर करू नका आणि इतर ॲप्स किंवा वेबसाइटसाठी एकच पासवर्ड वापरू नका.

२ **तुमचे ईमेल आणि मोबाइल नंबर सत्यापित करा**: Snapchat सेटिंग्जमध्ये तुमच्या खात्याशी संबंधित ईमेल पत्ता आणि मोबाइल नंबर अचूक आहे हे सत्यापित करा.

३ **दोन-घटक प्रमाणीकरण सेट अप करा**: तुमच्या Snapchat खात्यामध्ये तुम्हीच लॉगिन केले आहे हे सत्यापित करण्यासाठी हे एक पर्यायी सुरक्षा वैशिष्ट्य आहे! यामुळे तुमचे खाते अधिक सुरक्षित होते. येथे अधिक जाणून घ्या.

४ **मित्रांदरम्यान ठेवा**: Snapchat तुमच्या जवळच्या मित्रांच्या संपर्कात राहण्यासाठी बनवले आहे. आम्ही शिफारस करतो की तुम्ही मित्रांकडून किंवा वास्तविक जीवनात ओळखत असलेल्या लोकांकडून मित्र विनंत्या स्वीकारल्या पाहिजेत. तुमच्या किशोरवयीन मुलाला/मुलीला आठवण करून द्या की ऑनलाइन भेटलेल्या व्यक्तींना प्रत्यक्षात भेटणे सुरक्षित नाही!

५ **तुमच्या गोपनीयता सेटिंग्ज तपासा**: तुम्हाला Snaps कोण पाठवू शकतात, तुमच्या गोष्टी कोण पाहू शकतात किंवा Snap मॅपवर तुमचे स्थान कोण पाहू शकतात हे तुमच्या सेटिंग्जमधून निवडा. तुमचे मित्र आपोआपच तुमच्याशी संपर्क साधू शकतात किंवा तुमची गोष्ट पाहू शकतात.

६ **मॅपवर तुमचे स्थान सानुकूलित करा**: तुम्ही जोडलेल्या सर्व मित्रांसह किंवा फक्त निवडलेल्या मित्रांच्या ग्रुपसह तुमचे स्थान शेअर करण्याचे निवडू शकता किंवा तुम्हाला कोणाहीसोबत शेअर करायचे नसेल तर तुम्ही घोस्ट मोड चालू करू शकता. Snap मॅप फक्त तुम्ही ॲप वापरत असताना तुमचे स्थान अपडेट करते आणि फक्त तुम्ही निवडलेल्या लोकांसोबत तुमचे स्थान शेअर करते!

७ **माझी गोष्ट कोण पाहू शकते ते बदला:** फक्त तुम्ही जोडलेले Snapchatters तुमची गोष्ट पाहू शकतात ही मूळ गोपनीयता सेटिंग असते. तुम्ही तुमच्या गोष्टीवर Snap पोस्ट करता तेव्हाचे गोपनीयता सेटिंग्ज तुम्ही नंतर सेटिंग्ज बदलल्या तरीही, फक्त त्या Snap पुरतेच राहते.

८ **Snapchat वर दुरुपयोगाची तक्रार नोंदवा**: तुम्ही Snapchat वर कधीही दुरुपयोगाची तक्रार नोंदवू शकता, त्यात छळवणूक, दमदाटी आणि इतर कोणत्याही सुरक्षा चिंता समाविष्ट आहेत. जर कोणीतरी तुम्हाला त्रास देत असेल तर तुम्ही त्या Snapchatter ला ब्लॉकदेखील करू शकता आणि कोणताही ग्रुप चॅट सोडू शकता. तक्रार करण्यासाठी Snap किंवा गोष्ट दाबा आणि धरून ठेवा आणि "Snap ची तक्रार करा" बटण टॅप करा.

९ **मित्रांना काढून टाकणे आणि ब्लॉक करणे यामधील फरक**: तुम्ही एखाद्याला तुमच्या मित्र सूचीमधून काढून टाकता तेव्हा ते तुमच्या कोणत्याही खाजगी गोष्टी पाहू शकत नाहीत पण तुम्ही सार्वजनिक सेट केलेला कोणताही मजकूर ते पाहू शकतात. तुमच्या गोपनीयता सेटिंग्जच्या आधारावर, ते तरीही तुमच्यासोबत चॅट करू शकतील किंवा तुम्हाला Snap पाठवू शकतील. तुम्ही एखाद्या मित्राला ब्लॉक करता तेव्हा ते तुमची गोष्ट पाहू शकणार नाहीत, तुम्हाला Snaps पाठवू शकणार नाहीत किंवा तुम्हाला चॅट पाठवू शकणार नाहीत.



# तुम्हाला लक्षात ठेवून आरोग्य संसाधने


Snap त्याच्या समुदायाच्या सुरक्षा आणि कल्याणासाठी पूर्णपणे बांधील आहे. आम्ही आमच्या Snapchatters ना सुरक्षित, निरोगी आणि माहितीपूर्ण ठेवण्यासाठी टीम, तंत्रज्ञाने, धोरणे आणि भागीदारी नियुक्त करतो.

आम्ही गरजेनुसार Snapchatters ना संसाधने आणि सहाय्यता प्रदान करण्यासाठी इंडस्ट्रीच्या तज्ञ आणि शासकीय नसलेल्या एजन्सींसोबत कार्य करतो. आमच्या सुरक्षा भागीदारांच्या संपूर्ण सूचीसाठी, आमच्या सुरक्षा भागीदार ला भेट द्या.


तुमच्या किशोरवयीन मुलांना/मुलींना सहाय्यता करण्यासाठी Snapchat ॲपमध्ये संसाधने आणि कल्याण वैशिष्ट्ये प्रदान करते म्हणजे त्यांना भावनात्मक सहाय्यता हवी असो किंवा फक्त चॅट करायचे असो, ते तसे करू शकतात! आमची कल्याण वैशिष्ट्ये Snapchat समुदायाच्या सदस्यांना शिक्षित आणि सशक्त करण्यासाठी डिझाइन केली आहेत ते मानसिक आरोग्याशी स्वतः लढा देणाऱ्या मित्रांना मदत करू शकतात!

**क्रायसिस टेक्स्ट लाईन**: आम्ही क्रायसिस टेक्स्ट लाईनसह भागीदारी करतो, हे यूएसमध्ये राहणाऱ्या Snapchatters ना लाइव्ह, प्रशिक्षित क्रायसिस काउंसलरसह विनामूल्य चॅट करण्याची अनुमती देतात आणि हे २४/७ उपलब्ध आहे. फक्त **७४१७४१ वर KIND** टेक्स्ट पाठवा किंवा ॲपमध्ये क्रायसिस टेक्स्ट लाईन शोधा! तुम्ही यूएस बाहेर राहत असाल तर अधिक माहितीसाठी आमची सुरक्षा संसाधने तपासा.

CRISIS TEXT LINE |




**हेडस्पेस मिनी**: हेडस्पेस आणि Snap Snapchatters ना थेट ॲपमधून मार्गदर्शित ध्यान आणि जागरूकता सराव प्रदान करण्यासाठी भागीदारी करत आहेत. हेडस्पेस मिनीसह, Snapchatters मित्रांसोबत ध्यान करू शकतील आणि गरजू मित्रांना सकारात्मकपणे प्रोत्साहित करणारे मेसेज पाठवू शकतील. लक्षात घ्या, हे वैशिष्ट्य फक्त काही देशांमध्ये उपलब्ध आहे.




**Here For You**: लोक जेव्हा शोध (सर्च) करताना संकटकालीन परिस्थितीशी संबंधित शब्द टाइप करतात ज्यामधे नैराश्य, चिंता, दु:ख, दमदाटी, सकारात्मक व्यक्तिमत्व, LGBTQ मानसिक आरोग्य इत्यादी घटक समाविष्ट असतात, तेव्हा त्यांना व्यावसायिक ना-नफा संस्थांकडील स्थानिक संसाधने आणि मजकूर या साधनावरून दाखविला जातो.

**ॲपमधून तक्रार करणे**: आमचे ॲपमधून तक्रार करण्याचे साधन Snapchatters ना त्यांचे मित्र स्वत:ला दुखापत करतील अशी काळजी असताना आम्हाला निनावीपणे सूचित करण्याची अनुमती देते. आम्ही Snap ला सूचित करत असलेल्या आणि ॲपमधून सहाय्यता प्राप्त करत असलेल्या व्यक्तीसोबत सहाय्यता साइट पेज हे संसाधन शेअर करतो, ज्यावर २० पेक्षा जास्त देश आणि भाषांमध्ये आत्मघात आणि संकट हॉटलाइन संसाधने आहेत.

२०१७ मध्ये आम्ही आमच्या समुदायाच्या सदस्यांसाठी ॲपमधून संकट संसाधने लाँच केली. हा हस्तक्षेप Snapchat सहाय्यताकडून मेसेज म्हणून दिसून येतो. जेव्हा आम्हाला पूर्ण विश्वास असतो की जीवाला हानी पोहोचवू शकणारी आपत्कालीन परिस्थिती उद्भवली आहे तेव्हा आमची कायदा अंमलबजावणी ऑपरेशन्स टीम कायदा अंमलबजावणीशी संपर्क करेल. Snapchat एक व्यावसायिक मानसिक आरोग्य हस्तक्षेप संसाधन नाही. जर एखादा मित्र किंवा प्रिय व्यक्ती धोक्यात असेल तर आपत्कालीन सेवा जसे की आत्महत्या प्रतिबंध हॉटलाईन, क्रायसिस टेक्स्टलाईन किंवा ९११ वर कॉल करा.

**सुरक्षा स्नॅपशॉट डिस्कव्हर चॅनेल**: तुमच्या किशोरवयीन मुलांना/मुलींना सेफ्टी स्नॅपशॉटची सदस्यता घेण्यासाठी प्रोत्साहित करा. हा एक डिस्कव्हर शो आहे जो Snapchatters ना डिजिटल सुरक्षेबद्दल शिक्षण देण्यावर आणि तुमचे Snapchat खाते सुरक्षित ठेवण्याच्या महत्त्वपूर्ण मार्गांवर लक्ष केंद्रित करतो!लक्षात घ्या, हे चॅनेल केवळ निवडक देशांमध्ये उपलब्ध आहे.

**संसाधन पेज**: तुमच्यासाठी आणि तुमच्या किशोरवयीन मुलासाठी/मुलीसाठी सुरक्षा भागीदारांच्या आणि संसाधनांच्या संपूर्ण सूचीसाठी, आमचे सुरक्षा केंद्र पहा!

स्कॅन करण्यासाठी ॲपमध्ये टॅप करा आणि धरून ठेवा

# तुमच्या किशोरवयीन मुलांशी/मुलींशी कसे बोलायचे

# संभाषण सुरू करा

आम्हाला माहित आहे की Snapchat वापरण्याबद्दल आपल्या किशोरवयीन मुलांशी/मुलींशी संवाद साधण्यास सक्षम असणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच आम्ही आपल्या किशोरवयीन मुलासह/मुलीसह Snap वरून कसे कनेक्ट करावे, संभाव्य काळजी वाटणारे वर्तन कसे ओळखावे आणि ॲपमध्ये आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबद्दल काही संभाषण सुरू करणाऱ्याबद्दल माइंडअप, क्रायसिस टेक्स्ट लाईन तज्ञांशी आणि Snap पालकांसोबत भागीदारी केली आहे!

## सहभागी व्हा

तुमचे स्वतःचे Snapchat वापरकर्त्याचे खाते तयार केल्याने तुम्हाला ॲप समजण्यास आणि तुमच्या किशोरवयीन मुलाशी/मुलीशी अधिक चांगल्याप्रकारे संपर्क साधण्यास मदत होते.
**तज्ञाचा ॲप वापराबद्दल सल्ला** : तुमच्या किशोरवयीन मुलाकडून/मुलीकडून तुमचे नवीन Snapchat खाते कसे वापरायचे हे शिका!



## संभाषण चालू ठेवण्यासाठी विचारण्याकरिता येथे काही मजेदार प्रश्न आहेत:

- तुमचे Bitmoji कसे दिसते हे मला पाहता येईल का?
- तुम्ही आपल्यासाठी कौटुंबिक खाजगी गोष्ट किंवा ग्रुप चॅट तयार करू इच्छिता?
- तुम्ही सर्वात जास्त कोणता फिल्टर वापरता?
- कोणता डिस्कव्हर शो तुम्हाला सर्वात आवडतो? मला कोणते आवडतील?
- बेस्ट फ्रेंड्स Snapchat वर काय करतात?
- तुमचा सर्वात लांब Snapstreak कोणता आहे?
- मला Snap सेव्ह करता येईल? तो सेव्ह केल्यावर कुठे जातो?
- मला Snap मॅपवर घोस्ट मोडवर कसे जाता येईल?
- ॲपमधील तुमचा आवडता टॅब कोणता आहे?
- मी पोस्ट केलेले काहीही फक्त माझे मित्र पाहत आहेत हे मला कसे सुनिश्चित करता येईल?
- तुमचा आवडता Snap गेम कोणता आहे?


## चिंता ओळखणे:

तुमच्या किशोरवयीन मुला/मुलीच्या कोणत्या वर्तनावर तुम्ही लक्ष ठेवले पाहिजे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हे वर्तन कदाचित तुम्हाला सूचित करू शकतात की तुमच्या किशोर मुलाला/मुलीला ऑनलाइन समस्या येत आहे आणि त्यांना कदाचित तुमच्याकडून, काउंसलरकडून किंवा अन्य प्रौढ व्यक्तीकडून काही अतिरिक्त सहाय्यतेची गरज असू शकते. तुम्हाला खालीलपैकी कोणतीही गोष्ट लक्षात येत आहे का?

- व्यक्तिमत्वात फरक (चिंता, भिती, किंवा राग वाढला)
- तंत्रज्ञानाबद्दल संभाषणे टाळणे
- त्यांचा फोन किंवा लॅपटॉप वापरणे टाळत आहेत
- मित्र आणि कुटुंबाला भेटत नाही
- शालेय वर्तनात बदल (कमी मार्क पडणे, उपस्थिती कमी, वर्गात झोपत आहे)
- स्वतःला दुखापत करण्याची कल्पना



तुमच्या लक्षात आल्यास, तुमच्या किशोरवयीन मुला/मुलीबरोबर नक्कीच बोला आणि एखाद्या व्यावसायिकाची मदत घ्या किंवा आमचे Here For You साधन तपासा. कोणत्याही तातडीच्या संकटासाठी, खात्री करा की त्यांना माहित आहे की क्रायसिस टेक्स्ट लाईन **७४१७४१ वर KIND** टेक्स्ट पाठवून २४/७ उपलब्ध आहे. Snapchat समुदायाला त्यांच्या प्रशिक्षित क्रायसिस काउंसलरकडून विनामूल्य, गोपनीय समर्थन मिळावे यासाठी आम्ही त्यांच्याशी थेट भागीदारी केली आहे.









## आरोग्याची काळजी घेणे:

Snapchat असे डिझाइन केले गेले आहे की लोकांना तुम्ही शेअर केलेल्या गोष्टी तुम्हाला त्या किती वेळ शेअर करायच्या आहेत तितक्याच वेळ पाहता येतील. आम्ही आमचा 'डिझाइनद्वारे सुरक्षितता' हा दृष्टिकोन वापरून नवीन उत्पादने आणि वैशिष्ट्ये विकसित करतो, जी आमचा समुदाय किंवा त्यांचे मित्र एखादे मानसिक आरोग्य संकट अनुभवत असतील तर त्यांना प्रतिबंधात्मक आरोग्य साधने आणि संसाधनांमध्ये प्रवेश करण्यास मदत करतात.

## तुमच्या किशोरवयीन मुलासह/मुलीसह संवाद साधण्याचे काही मार्ग:

- तुम्ही ध्यान करण्यासाठी कधीही हेडस्पेस वापरले आहे का? संशोधन असे सांगते की ध्यान केल्याने किंवा सतर्क जागरूकतेचा सराव केल्यामुळे तणाव कमी होऊ शकतो आणि आरोग्य सुधारते
- तुम्हाला एखाद्याच्या Snapchat ची तक्रार करायची असेल तर ती कशी करायची तुम्हाला माहित आहे का?
- तुमच्या सुरक्षिततेसाठी समर्पित सेफ्टी स्नॅपशॉट डिस्कव्हर चॅनेल तुम्ही पाहता का?
- Here For You याची तुम्ही सदस्यता घेतली आहे? Snapchat वरील शोध बारमध्ये “Here For You” शोधून हे शोधले जाऊ शकते
- तुम्हाला असे वाटते की Snapchat वर एखादी गोष्ट तुम्हाला त्रास देत असेल तर त्याविषयी बोलण्यासाठी कोणीतरी आहे?
- Snapchat वर तुमची सहाय्यता करण्यासाठी कोणती संसाधने उपलब्ध आहेत हे तुम्हाला माहिती आहे का?
- तुम्ही ॲपमध्ये किती वेळ घालवता?
- ॲप वापरताना तुम्हाला कधीही भिती वाटते? असे वाटल्यास तुम्ही काय करता?

> **भावनांची जाणीव ठेवणे, कृतज्ञता व्यक्त करणे आणि दयाळूपणे वागणे यासारख्या सकारात्मक मानसिक सवयींचा अभ्यास करून आपण सर्वांमध्ये अधिक आनंद आणि कल्याण करण्याची क्षमता आहे.**
>
> ***- मॉली स्टीवर्ट लॉलर, पीएचडी***

mindup For Life | The Goldie Hawn Foundation

## तुमच्या किशोरवयीन मुला/मुलीसोबत बोलल्यानंतर:

आता तुम्ही आणि तुमचा/ची किशोरवयीन मुलगा/मुलगी Snapchat बद्दल संवाद साधण्यास चांगले तयार आहात, तर भविष्यासाठी काही करार निश्चित करणे आणि तुम्ही ही संभाषणे सातत्याने करीत आहात हे सुनिश्चित करणे चांगले आहे! सोशल मीडिया कॉन्ट्रॅक्ट तयार करणे देखील दोन्ही बाजूंनी गोपनीयता आणि विश्वास ठेवण्यात मदत करू शकते. ही आश्वासने दिल्यास दोन्ही पक्षांमधील विश्वास वाढविण्यात मदत होते.

तुमच्या किशोरवयीन मुला/मुलीबरोबर निकोप संवाद वाढविण्यासाठी आणि त्यांच्या निकोप स्क्रीन आणि सोशल मीडियाच्या सवयींच्या विकासास समर्थन देण्यासाठी येथे काही संभाषण सुरू करण्याचे प्रकार दिले आहेत:

- बोलण्याची सवय लावणे; कुटुंबात एकत्र जेवतांना बोलण्यासाठी आणि ऐकण्यासाठी वेळ काढा
- तुमच्या किशोरवयीन मुलाला/मुलीला संभाषणात सामील करा, जसे की "याबद्दल तुमचे काय मत आहे?" असे प्रश्न विचारणे आणि त्यांच्या कल्पनांना मोकळेपणाने प्रतिसाद देणे
- अडथळे दूर करून आणि नजरेला नजर भिडवून खरोखर कसे ऐकायचे ते शिका
- एकमेकांच्या सहमतीने दररोजसाठी एक टाइम ब्लॉक निश्चित करा ज्यात सोशल मीडिया किंवा फोन “ब्रेक” समाविष्ट असेल
- ऑनलाइन जोखीम आणि चिंतांविषयी उघडपणे बोला, त्यांना ब्लॉक करणे आणि तक्रार करणे यासारख्या ऑनलाइन जोखमींवरील व्यावहारिक समाधान प्रदान करा

तुमच्या किशोरवयीन मुलाला/मुलीला सोशल मीडियावर सुरक्षित आणि चांगले राहण्यास मदत करण्यासाठी हे काही मुख्य दिशानिर्देश आहेत:

- सोशल पोस्ट तुमच्या जवळच्या मंडळात ठेवण्याचे महत्त्व - फक्त तुम्ही ओळखत असलेल्या लोकांकडून मित्र विनंत्या स्वीकारणे
- तुम्ही पोस्ट करण्यापूर्वी नेहमी स्वत:ला विचारा: आजी काय म्हणेल?
- त्रयस्थपणे उभे राहून मजा पाहू नका — तुम्हाला अस्वस्थ करणारे काहीतरी दिसल्यास त्याची तक्रार करा!
- नेहमी दयाळूपणे समुदायिक दिशानिर्देशांमध्ये राहून कृती करा



# Snapchat शब्दावली (A-Z)

**Snapcode:** Snapcode ही एक विशेष प्रकारची प्रतिमा आहे जी तुम्ही नवीन मित्र जोडा किंवा फिल्टर्स आणि लेन्सेस अनलॉक करा यासारख्या भिन्न गोष्टी करण्यासाठी Snapchat सह स्कॅन करू शकता.

**Snap मॅप:** काय होत आहे ते पहा, तुमचे मित्र शोधा आणि या टॅबसह साहस दाखवण्यासाठी प्रेरणा मिळवा. स्थान-शेअरिंग आपोआप बंद आहे -- तुम्हाला तुमचे स्थान मित्रांसह शेअर करायचे आहे किंवा ते घोस्ट मोडसह स्वत:पर्यंत ठेवायचे आहे हे तुम्ही ठरवू शकता.

**Snap स्टार्स:** मजकूर निर्माता (जसे प्रभावक आणि सेलिब्रेटी) ज्यांचा प्रेक्षकवर्ग व्यापक आहे, त्यांच्याकडे सुवर्ण तारा असेल. तुम्ही या मजकूर निर्मात्यांची सदस्यता घेऊ शकता.

**आमची गोष्ट:** समुदायामध्ये वेगवेगळ्या Snapchatters कडून सादर केलेल्या स्नॅपचा संग्रह. आमची गोष्टवर दर्शवलेले Snaps हा सार्वजनिक मजकूर आहे जो Snap मॅप आणि प्लॅटफॉर्मबाहेरही दर्शवला जाऊ शकतो.

**कॅमेरा:** जिथे तुम्ही तुमच्या मित्रांना फोटो किंवा व्हिडिओ असलेले Snaps पाठवता!

**क्विक ॲड:** क्विक ॲडमधील मित्राच्या शिफारसी काही घटकांवर आधारित आहेत, जसे की तुम्ही आधीपासून कोणाचे मित्र आहात आणि तुम्ही कोणाची सदस्यता घेतली आहे.

**खाजगी गोष्ट:** खाजगी गोष्टी Snapchatters ना एक गोष्ट तयार करण्याची परवानगी देतात जी केवळ निवडलेल्या मित्रांसोबत शेअर केली जाते.

**गेम्स आणि Snap मिनी:** गेम्स Snapchat वर तुमच्या मित्रांसह वेळ घालवण्याचा एक मजेदार मार्ग आहे! Snap मिनी खास मित्रांसाठी बनवलेले छोटे उपक्रम आहेत, जसे मूव्ही नाईटची योजना आखणे किंवा फ्लॅशकार्डचा डेक बनविणे.

**घोस्ट मोड:** हे सक्षम असताना, तुमचे मित्र तुमचे स्थान Snap मॅपवर पाहू शकत नाहीत!

**चॅट:** तुमच्या खऱ्या मित्रांना व्हिडिओ, फोन किंवा टेक्स्ट चॅट पाठवा.

**डिस्कव्हर:** Snap वरील खास शो आणि मुख्य प्रवाहातील मीडियासह प्रीमियम बातम्या आणि मनोरंजन पहा.

**फक्त माझ्याकरिता:** हे वैशिष्ट्य मेमरीझमध्ये आढळलते आणि Snapchatters ना त्यांच्या मेमरीझमध्ये सेव्ह केलेल्या Snaps आणि गोष्टी त्यांच्या फक्त माझ्याकरिता टॅबमध्ये हलवू देते - ज्यास पाहण्यासाठी पासकोड आवश्यक असतो.

**फिल्टर्स:** Snap वर उजवीकडे स्वाइप केल्यावर रंग प्रभाव जोडणे, ठिकाणाची माहिती दाखविणे, तुमचे Bitmoji प्रदर्शित करणे, तुम्ही काय करत आहात हे दाखविणे इत्यादी कार्ये करण्यासाठी फिल्टर पर्याय दिसतील.

**माझी गोष्ट:** मित्र २४ तास पाहू शकतील अशा कालक्रमानुसार प्ले होणाऱ्या स्नॅप्सची मालिका. तुम्ही प्रत्येकासह, माझे मित्र किंवा लोकांच्या सानुकूलित सूचीसह शेअर करण्यासाठी पर्याय निवडू शकता.

**मेमरीझ:** तुमच्या मेमरीझमध्ये सेव्ह केलेल्या स्नॅपचॅटरच्या Snaps आणि गोष्टींचा वैयक्तिक संग्रह असतो.

**लेन्स:** लेन्स कॅरॉसेल चालू करण्यासाठी चेहऱ्यावर टॅप करा. लेन्सेस तुमच्या स्नॅपमध्ये 3D प्रभाव, ऑब्जेक्ट्स, कॅरेक्टर आणि ट्रान्सफॉर्मेशन जोडतात.

**शोधा:** शोधामध्ये टाइप केल्याने तुम्हाला भिन्न गोष्टी दर्शविल्या जातील, जेणेकरून तुमच्यासाठी सर्वात संबंधित काय आहे हे आपण शोधू शकता; जसे मित्र शोधणे किंवा आमचे तुमच्यासाठी येथे आहेत साधन तपासणे.

**सर्जनशील साधने:** तुम्ही Snap तयार केल्यानंतर, तुम्ही स्टिकर्स, मजकूर, डूडल्स आणि बरेच काही जोडू शकता.

**सानुकूल गोष्ट:** तुमच्या सानुकूल गोष्टीसाठी सदस्य निवडा! जो कोणी सामील होईल त्याला या गोष्टीमध्ये जोडता येईल आणि अन्य सदस्य पाहता येतील.

**स्ट्रीक्स:** हे चॅट स्क्रीनमधील तुमच्या मित्राच्या नावाशेजारी असलेल्या 🔥 इमोजीद्वारे दर्शविलेले वैशिष्ट्य आहे, म्हणजेच स्ट्रीक (एकमेकांना पाठवलेल्या Snaps ची संख्या) किती दिवस होते याचा आकडा. Snap स्ट्रीक्स म्हणजे तुम्ही कोणासह सर्वात जास्त Snap करत आहात हे ओळखण्याचा एक मजेदार आणि आनंदी मार्ग आहे!

**स्थान सेवा:** Snapchat तुमचे स्थान फिल्टर्स, शोध, Snap मॅप, जाहिरात आणि यासारख्या वैशिष्ट्यांसाठी वापरते. सक्षम केलेले असल्यास, तुमच्याकडे Snapchat उघडलेले असताना तुमचे स्थान अपडेट होईल.

**स्पॉटलाइट:** Snapchat चे जग एकाच ठिकाणी शोधा आणि या मनोरंजक प्लॅटफॉर्मवर आमच्या संपूर्ण समुदायाचे दृष्टिकोन पहा



Snap Inc.

जुलै २०२१ आवृत्ती